# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७२८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/११/२०१६

**१) मोटार सायकल चालकांने स्कुटीला धडक दिल्याने स्वत: व स्कुटीवर बसलेले दोघांना जखमी कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ४/११/२०१६ रोजी १३.०० वा. दर. यातील जखमी सुधीर दामोदर डोंगरे रा. सावरी याने फिर्यादी रविद्र सोनीराम मेश्राम वय ३१ वर्ष, रा. सावरी यास आपल्या स्कुटी क्र. एमएच ३१ चे १०७८ वर मागे बसवुन लाखनी येथुन कन्हाळमोह येथे जात असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन स्कुटीला धडक देवुन स्कुटीवर बसलेले दोन्ही इसम जखमी झाले व स्वत:ही जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९, ३३८ भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) जळाल्याने औषधउपचारा दरम्यान महीलेचा मृत्यु . :–**

दिंनाक. ०२/०११/२०१६ रोजी ००.३० वा. दर. यातील मृतक श्रीमती सुलोचना दग्गुजी मेश्राम वय ७५ वर्ष, रा. नाकाडोंगरी ही ७० टक्के जळाल्याने तिला औषधोपचारा करीता सा. रु भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौ चे कागदपत्र टपालाने प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. तांडेकर पो. स्टे. गोबरवाही येथे प्राप्त झाल्याने पोस्टे. गोबरवाही यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो. स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**३) गळफास लावुन इसमाचा मृत्यु. . :–**

दिंनाक. ०४/११/२०१६ रोजी १५ वा. दर. यातील मृतक राजेश महादेव पारधी वय ३३ वर्ष, रा. चुल्हाड ही पिलीयाच्या बिमारीचे त्रासाने स्वत:चे घरी छतावरील पंख्याला नायलॉन दोरीने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी महादेव भोलाजी पारधी वय ६६ वर्ष, रा. चुल्हाड यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक ०४/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ८७ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती १० केसेस व ईतर वाहनांवरती ७४ केसेस आणि अवैद्य प्रवासी ०३ केस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.